**मे. वेद स्टिल्स अँण्ड अलॉयज प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नं. ए-८ व ए-१३, अतिरीक्त एमआयडीसी फेज-३, जालना, ता.जि. जालना या प्रस्तावित नविन प्रकल्पामध्ये ३,९६,००० टीपीए एमएस बिलेटसच्या उत्पादनाकरीता २x४० एमटी/बॅच प्रवर्तन भटटी व हॉट रोल्ड प्रक्रियेद्वारे ३,८८,०८० टीपीए व रिहिटींग भटटीद्वारे १,०६,९२० टीपीए टीएमटी बार्स करीता रोलींग मिल चे उत्पादन करणे बाबत दिनांक २३/०५/२०२३ रोजी सकाळी ११:०० वाजता मे. वेद स्टिल्स अँण्ड अलॉयज प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नं. ए-८ व ए-१३, अतिरीक्त एमआयडीसी फेज-३, जालना, ता.जि. जालना येथे घेण्यात आलेल्या पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणीचे इतिवृत्त :-**

---

मे. वेद स्टिल्स अँण्ड अलॉयज प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नं. ए-८ व ए-१३, अतिरीक्त एमआयडीसी फेज-३, जालना, ता.जि. जालना या प्रस्तावित नविन प्रकल्पामध्ये ३,९६,००० टीपीए एमएस बिलेटसच्या उत्पादनाकरीता २x४० एमटी/बॅच प्रवर्तन भटटी व हॉट रोल्ड प्रक्रियेद्वारे ३,८८,०८० टीपीए व रिहिटींग भटटीद्वारे १,०६,९२० टीपीए टीएमटी बार्स करीता रोलींग मिल चे उत्पादन करणे बाबत दिनांक २३/०५/२०२३ रोजी सकाळी ११:०० वाजता मे. वेद स्टिल्स अँण्ड अलॉयज प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नं. ए-८ व ए-१३, अतिरीक्त एमआयडीसी फेज-३, जालना, ता.जि. जालना येथे पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी घेण्यात आली होती.

मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई-२८/ २०२३ पत्र क्रं. बी.ओ. / जे.डी.(डब्ल्यूपीसी) / पीएच / बी- २३०४२६- एफटीएस-००१७ दि. २६/०४/२०२३ अन्वये, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती गठीत करण्यात येऊन खालीलप्रमाणे समितीचे सदस्य सदर लोकसुनावणीस उपस्थित होते.

१. **श्री. केशव नेटके ,** : अध्यक्ष
अपर जिल्हादंडाधिकारी, जालना.

२. **श्री. सो. म. कुरमुडे,** : समन्वयक
उप-प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ, जालना.

श्री. सो. म. कुरमुडे, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, जालना तथा समन्वयक पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी यांनी उपस्थितांचे स्वागत करुन पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समितीचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सदर जाहीर लोकसुनावणीची कार्यवाही सुरु केली. त्यांनी सांगितले की, आज महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे मे. वेद स्टिल्स अँण्ड अलॉयज प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नं. ए-८ व ए-१३, अतिरीक्त एमआयडीसी फेज-३, जालना, ता.जि. जालना या प्रस्तावित नविन प्रकल्पामध्ये ३,९६,००० टीपीए एमएस बिलेटसच्या उत्पादनाकरीता २x४० एमटी/बॅच प्रवर्तन भटटी व हॉट रोल्ड प्रक्रियेद्वारे ३,८८,०८० टीपीए व रिहिटींग भटटीद्वारे १,०६,९२० टीपीए टीएमटी बार्स करीता रोलींग मिल चे

उत्पादन करणे बाबत पर्यावरणविषयक जाहीर लोकसुनावणी घेण्यात येत आहे. तसेच त्यांनी पूढे सांगितले की, सदर प्रस्तावित प्रकल्पाचा प्लॉट पून:विक्रीतून घेण्यात आलेला आहे ज्यामध्ये खरेदीवेळेसच चार शेडची उभारणी करण्यात आलेली होती तसेच एमआयडीसी तर्फे बीसीसी घेण्यात आले होते. सदर प्रकल्प हा पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकारचे अधिनियम दिनांक १४ सप्टेंबर, २००६ च्या अधिसूचनेनुसार 'ब' वर्गात मोडतो ज्यास पर्यावरण मंत्रालयाकडून पर्यावरण विषयक मंजुरी घ्यावी लागते, त्याचाच एक भाग म्हणून सदर प्रकल्पासाठी जाहीर लोक सूनावणी घेणे आवश्यक आहे. मे. वेद स्टिल्स अँण्ड अलॉयज प्रायव्हेट लिमिटेड यांचा पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी घेण्यासाठी म.प्र.नि. मंडळाकडे अर्ज दिं. १७/०४/२०२३ रोजी प्राप्त झाला. त्याअनूषंगाने मा. जिल्हाधिकारी जालना यांच्या परवानगीने आजची लोकसूनावणी दिं. २३/०५/२०२३ वेळ-सकाळी ११.०० वा. निश्चित करण्यात आली. पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी बाबत नियमानूसार ३० दिवस अगोदर दिं. २०/०४/२०२३ रोजी दैनिक सकाळ व दैनिक टाईम्स ऑफ इंडिया या वृत्तपत्रामध्ये जाहीर सूचना प्रसिध्द करण्यात आली. तसेच जिल्हयातील संबंधित शासकीय कार्यालये व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेतस्थळावर सदरच्या प्रकल्पाची माहिती पुस्तिका नागरिकांच्या अभ्यास व अवलोकनाकरीता ठेवण्यात आलेल्या होत्या, त्याची यादी खालीलप्रमाणे-

१. जिल्हाधिकारी कार्यालय, जालना.
२. जिल्हा परिषद, जालना.
३. जिल्हा उद्योग केंद्र, जालना.
४. नगर परिषद, जालना.
५. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, कार्यालय, जालना.
६. ग्रामपंचायत कार्यालय, खादगाव, दावलवाडी, घानेवाडी, जवसगाव, ता.जि. जालना.
७. उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, प्लॉट नं. पी-३/१ व पी-३/२, अतिरीक्त एमआयडीसी फेज-२, जालना.
८. प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, भूखंड क्रं. ए-४/१, एमआयडीसी चिकलठाणा औरंगाबाद.
९. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुख्यालय, कल्पतरू पॉईन्ट, ३ रा माळा, सायन माटूंगा स्कीम रोड नं.८, सायन सर्कल समोर, सायन (पूर्व), मुंबई-२२.
१०. पर्यावरण विभाग, नवीन प्रशासन भवन, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-३२.
११. प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, पश्चिम मध्य विभाग, तळमजला, पूर्व विंग, नविन सचिवालय इमारत, सिव्हील लाईन, नागपूर.

तसेच त्यांनी नमुद केले की, याबाबत काही सूचना/आक्षेप असल्यास याबाबत कळवण्यासाठी ३० दिवसाची मूदत देण्यात आलेली होती त्या अनुषंगाने उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, जालना येथे एकूण चार सूचना/आक्षेप प्राप्त झालेल्या आहेत ते खालीलप्रमाणे-

१. सौ. वत्सलाबाई जाधव, सरपंच, मौजे दावलवाडी.
२. सर्व गावकरी मौजे दावलवाडी.
३. रंगाराव कोठाकोंडा, सेवअर्थ, तेलंगना.
४. के. श्रीदेवी, वेलफिअर पिपल फाउंडेशन.

तरी उपस्थित नागरिकांमंधून कोणास कांही लेखी/तोंडी आक्षेप/टिका/टिप्पणी नोंदवायचे असतील तर ते सदर सुनावणी दरम्यान नोंदवू शकतात. त्यानंतर श्री. सो. म. कुरमुडे यांनी सदर प्रकल्प प्रवर्तकांना प्रस्तावित प्रकल्पाविषयीचे सादरीकरण करण्याविषयी विनंती केली.

डॉ. प्रदीप पीपळतकर, प्रकल्प सल्लागार, मे. पोल्यूशन एण्ड इकोलॉजी सर्विसेस लि., नागपूर यांनी प्रकल्पाबददल विविध मुदयांवर सादरीकरण केले जसे की,- पर्यावरण प्रभाव मुल्यांकन आणि जाहीर जनसुनावणीचे प्रयोजन, प्रकल्पाचा तपशिल, प्रकल्पाचा आराखडा, पर्यावरण सदयस्थितीचा अभ्यास, स्थानीक पर्यावरणाचा तपशील व परिसराची माहिती, अभ्यास स्थळाची माहिती, अध्ययन क्षेत्रातील हवेचा दर्जा, अध्ययन क्षेत्रातील ध्वनीची तीव्रता, अध्ययन क्षेत्रातील पाण्याची गुणवत्ता, अध्ययन क्षेत्रातील मातीची गुणवत्ता, जैव पर्यावरण, सामाजिक आर्थीक पर्यावरण, सभोवतालच्या पर्यावरणावर होणारे अपेक्षित परिणाम, पर्यावरण व्यवस्थापन आराखडा, विविध पर्यावरण विषयक परिणामांच्या उपाय योजना, पर्यावरण जबाबदारी योजने अंतर्गत सामाजिक-आर्थीक कल्याण उपक्रम, पर्यावरण व्यवस्थापन खर्चाची तरतूद, प्रकल्पाचे फायदे इत्यादी. सदर माहिती सीडीमध्ये रेकॉर्डींग करण्यात आली असून संक्षिप्तमध्ये इतिवृत्तात नोंद करण्यात आली आहे.

प्रकल्प सल्लागारांनी सदर प्रकल्पाचे पॉवर पॉईंट सादरीकरण समाप्त केल्यानंतर श्री. सो. म. कुरमुडे, यांनी सांगितले की, उपस्थित नागरिकांना कांही लेखी/तोंडी आक्षेप/टिका/टिप्पणी नोंदवायचे असतील तर ते नोंदवू शकतात प्रथमत: त्यांनी आपले नाव व गावाचे नाव सांगून प्रश्न विचारावेत. तसेच सदर पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी ही पर्यावरण विषयक आहे त्यामूळे उपस्थित नागरिकांनी त्यांचे जे काही प्रश्न आक्षेप/टिका/टिप्पणी असतील ते केवळ पर्यावरण विषयक विचारावेत.

त्यानंतर प्रस्तावित प्रकल्पाबाबत खालील प्रमाणे सूचना/हरकती/आक्षेप इत्यादी प्राप्त झाले. त्याचे प्रकल्प व्यवस्थापकाच्या वतीने त्यांचे सल्लागार/प्रतिनीधी यांनी दिलेले उत्तर/आश्वासन खालीलप्रमाणे आहेत-

| अ.क्रं | केलेले टिका टिप्पणी, आक्षेप, सुचना मुददा इत्यादी व उपस्थित व्यक्तिचे नांव. | उदयोगाच्या प्रतिनिधीने/ प्रकल्प सल्लागार यांनी दिलेले आश्वासन / उत्तर. |
|---|---|---|
| १. | श्री. भीमराव म्हस्के, रा. मांडवा यांनी विचारले की, स्थानिक लोकांना येथे रोजगार मिळणार का. | यावर डॉ. प्रदीप पिपळतकर, प्रकल्प सल्लागार, यांनी उत्तर दिले की, या प्रकल्पामध्ये १० कि.मी. च्या आत जेवढी गावे आहेत तेथील लोकांना रोजगारासाठी प्राधाण्य राहील तसेच युवा पिढीला रोजगारासाठी संधी देण्यात येईल. |
| २. | श्री. सो.म. कुरमुडे, उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, जालना तथा समन्वयक पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी यांनी प्रकल्प सल्लागार यांना सांगितले की, आपण सादरीकरणामध्ये भांडवली खर्च हवा प्रदूषण नियंत्रणेसाठी दाखवला आहे तो अत्यंत कमी आहे तो यापेक्षा अधिक असायला हवा याचे स्पष्टीकरण देण्यात यावे. | यावर उद्योगाचे प्रतिनीधी श्री. डी.बी. सोनी यांनी सांगितले की, भांडवली खर्च जो दाखवला आहे तो यापेक्षा अधिक आहे याबाबत सूधारणा करण्यात येईल, तसेच हवा प्रदूषण नियंत्रण सयंत्रणेसाठी यामध्ये नवीन टेक्नोलॉजीच्या सयंत्रणा बसविण्यासाठी भांडवली खर्च नियोजीत केलेले आहे. |

तरी उपस्थित नागरिकांमंधून कोणास कांही लेखी/तोंडी आक्षेप/टिका/टिप्पणी नोंदवायचे असतील तर ते सदर सुनावणी दरम्यान नोंदवू शकतात. त्यानंतर श्री. सो. म. कुरमुडे यांनी सदर प्रकल्प प्रवर्तकांना प्रस्तावित प्रकल्पाविषयीचे सादरीकरण करण्याविषयी विनंती केली.

डॉ. प्रदीप पीपळतकर, प्रकल्प सल्लागार, मे. पोल्यूशन एण्ड इकोलॉजी सर्विसेस लि., नागपूर यांनी प्रकल्पाबददल विविध मुदयांवर सादरीकरण केले जसे की,- पर्यावरण प्रभाव मुल्यांकन आणि जाहीर जनसुनावणीचे प्रयोजन, प्रकल्पाचा तपशिल, प्रकल्पाचा आराखडा, पर्यावरण सदयस्थितीचा अभ्यास, स्थानीक पर्यावरणाचा तपशील व परिसराची माहिती, अभ्यास स्थळाची माहिती, अध्ययन क्षेत्रातील हवेचा दर्जा, अध्ययन क्षेत्रातील ध्वनीची तीव्रता, अध्ययन क्षेत्रातील पाण्याची गुणवत्ता, अध्ययन क्षेत्रातील मातीची गुणवत्ता, जैव पर्यावरण, सामाजिक आर्थीक पर्यावरण, सभोवतालच्या पर्यावरणावर होणारे अपेक्षित परिणाम, पर्यावरण व्यवस्थापन आराखडा, विविध पर्यावरण विषयक परिणामांच्या उपाय योजना, पर्यावरण जबाबदारी योजने अंतर्गत सामाजिक-आर्थीक कल्याण उपक्रम, पर्यावरण व्यवस्थापन खर्चाची तरतूद, प्रकल्पाचे फायदे इत्यादी. सदर माहिती सीडीमध्ये रेकॉर्डीग करण्यात आली असून संक्षिप्तमध्ये इतिवृत्तात नोंद करण्यात आली आहे.

प्रकल्प सल्लागारांनी सदर प्रकल्पाचे पॉवर पॉईंट सादरीकरण समाप्त केल्यानंतर श्री. सो. म. कुरमुडे, यांनी सांगितले की, उपस्थित नागरिकांना कांही लेखी/तोंडी आक्षेप/टिका/टिप्पणी नोंदवायचे असतील तर ते नोंदवू शकतात प्रथमत: त्यांनी आपले नाव व गावाचे नाव सांगून प्रश्न विचारावेत. तसेच सदर पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी ही पर्यावरण विषयक आहे त्यामूळे उपस्थित नागरिकांनी त्यांचे जे काही प्रश्न आक्षेप/टिका/टिप्पणी असतील ते केवळ पर्यावरण विषयक विचारावेत.

त्यानंतर प्रस्तावित प्रकल्पाबाबत खालील प्रमाणे सूचना/हरकती/आक्षेप इत्यादी प्राप्त झाले. त्याचे प्रकल्प व्यवस्थापकाच्या वतीने त्यांचे सल्लागार/प्रतिनीधी यांनी दिलेले उत्तर/आश्वासन खालीलप्रमाणे आहेत-

| अ.क्रं | केलेले टिका टिप्पणी, आक्षेप, सुचना मुददा इत्यादी व उपस्थित व्यक्तिचे नांव. | उदयोगाच्या प्रतिनिधीने/ प्रकल्प सल्लागार यांनी दिलेले आश्वासन / उत्तर. |
|---|---|---|
| १. | श्री. भीमराव म्हस्के, रा. मांडवा यांनी विचारले की, स्थानिक लोकांना येथे रोजगार मिळणार का. | यावर डॉ. प्रदीप पिपळतकर, प्रकल्प सल्लागार, यांनी उत्तर दिले की, या प्रकल्पामध्ये १० कि.मी. च्या आत जेवढी गावे आहेत तेथील लोकांना रोजगारासाठी प्राधाण्य राहील तसेच युवा पिढीला रोजगारासाठी संधी देण्यात येईल. |
| २. | श्री. सो.म. कुरमुडे, उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, जालना तथा समन्वयक पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी यांनी प्रकल्प सल्लागार यांना सांगितले की, आपण सादरीकरणामध्ये भांडवली खर्च हवा प्रदूषण नियंत्रणेसाठी दाखवला आहे तो अत्यंत कमी आहे तो यापेक्षा अधिक असायला हवा याचे स्पष्टीकरण देण्यात यावे. | यावर उद्योगाचे प्रतिनीधी श्री. डी.बी. सोनी यांनी सांगितले की, भांडवली खर्च जो दाखवला आहे तो यापेक्षा अधिक आहे याबाबत सूधारणा करण्यात येईल, तसेच हवा प्रदूषण नियंत्रण सयंत्रणेसाठी यामध्ये नवीन टेक्नोलॉजीच्या सयंत्रणा बसविण्यासाठी भांडवली खर्च नियोजीत केलेले आहे. |

| | | |
|---|---|---|
| ३. | श्री. पदमाकर हजारे, उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, औरंगाबाद यांनी विचारले की, प्रकल्पामध्ये दाखलेला सीएसआर निधी किती व कशा प्रकारे वापरणार आहात. | यावर उद्योगाचे प्रतिनीधी श्री. डी.बी. सोनी यांनी सांगितले की, सीएसआर निधी हा जवळपास पाच वर्षानंतर वापरण्यात येतो कारण कंपनीचे नेट प्रॉफीट वाढल्यानंतर त्यापैकी ५ टक्के निधी हा सीएसआर खर्चामधून वापरला जातो तसेच पर्यावरणासाठी व स्थानिक रोजगार निर्मीतीसाठी सीएसआर मधील निधी मा. जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली उपलब्द करून देण्यात येईल. |
| ४. | श्री. अर्जून वाहूळे, रा. जामवाडी, यांनी विचारले की, या नविन प्रकल्पामध्ये महिलांसाठी रोजगार मिळेल का व त्यांच्यासाठी येथे सुविधा राहतील का. आणि प्रकल्पातून जे सांडपाणी निर्माण होईल त्यासाठी काय उपाययोजना केलेल्या आहेत. | यावर उद्योगाचे प्रतिनीधी डॉ. रितेश अ. अग्रवाल यांनी सांगितले की, महिलांसाठी या प्रकल्पामध्ये जेथे शक्य होईल तेथे म्हणजे सोपे असे काम देण्यात येईल मुख्यता: ऑफीसच्या ठिकाणीच रोजगार देण्याचे नियोजीत आहे. पूढे सांडपाण्याच्या प्रश्नावर त्यांनी सांगितले की, या प्रकल्पामध्ये Sevage Treatment Plant उभारण्यात येणार आहे व हे पाणी उद्योगातील वृक्षारोपणास वापरण्यात येईल त्यामूळे प्रकल्पामधून कूठल्याही प्रकारचे सांडपाणी बाहेर जाणार नाही. |
| ५. | श्री. सूनिल हिवाळे, रा. जालना यांनी विचारले की, प्रकल्पामूळे वायू व ध्वनी प्रदूषण होईल यावर काय उपाययोजना केलेल्या आहेत. | यावर डॉ. प्रदीप पिपळतकर, प्रकल्प सल्लागार, यांनी उत्तर दिले की, हवेचे प्रदूषण होवू नये यासाठी अत्याधुनिक हवा प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा बसविण्यात येणार आहे ज्यामध्ये प्रथम व द्वितीय स्वरूपाची हवा प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा व बॅग फिल्टर व चिमणी बसविण्यात येईल. तसेच ध्वनीच्या प्रदूषणासाठी नवीन टेक्नोलॉजीच्या अद्यावत यंत्रणा बसविण्यात येणार आहेत. कामगारांना वैयक्तिक संरक्षणात्मक उपकरणे जसे की, इअर प्लग इ. पुरविल्या जातील तसेच याव्यतिरीक्त इतरही अधिकच्या सुविधा केल्या जातील आणि कंपनीच्या बाहेर ध्वनी प्रदूषण होऊ नये म्हणून पूर्ण काळजी घेतली जाईल. |
| ६. | श्री. विकास खरात, रा. मांडवा, यांनी विचारले की, आजूबाजूच्या परिसराचा विकास होण्यासाठी प्रकल्पाच्या काय उपाययोजना आहे? | यावर डॉ. प्रदीप पिपळतकर, प्रकल्प सल्लागार, यांनी उत्तर दिले की, आजूबाजूच्या परिसराचा विकास करण्यासाठी कंपनीच्या सीएसआर निधीमधून खर्च करण्यात येईल तसेच गावक-यांनी कंपनीच्या प्रतिनीधी सोबत समन्वय साधून जेथे विकासाची कामे |

| | | |
|---|---|---|
| | | करायची आहेत ते कळवावे त्यानूसार नक्कीच सीएसआर निधी मा. जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनासाठी उपलब्द करून देण्यात येईल.<br><br>पूढे यावर उद्योगाचे प्रतिनीधी डॉ. रितेश अ. अग्रवाल यांनी सांगितले की, मा. जिल्हाधिकारी, जालना यांच्या सोबत बैठक घेवून येथूनच जवळ असलेले घानेवाडी तलावाचे गाळप काढण्याचे काम करायचे निर्धारित केलेले आहे ते काम लवकरच पूर्ण करण्यात येईल तसेच झाडे लावण्याचे काम सूध्दा कंपनीतर्फे राबवण्यात येणार आहे व त्यासाठी कंपनीने अगोदरच झाडे खरेदी केलेली आहे. तसेच जवळच असलेले पारसी टेकडी येथे एकूण १००० झाडे लावण्यात आलेली आहेत. तसेच आजूबाजूच्या गावातील नागरिकांना रोजगार येथे मिळणार आहे यामूळे परिसराचा विकास होण्यास नक्कीच मदत होईल. तसेच त्यांनी पूढे सांगितले की, गावातील सरपंच यांच्याशी बैठक घेवून काही विकासाचे कामे असतील तर तेही करण्याचा प्रयत्न केला जाईल. |
| ७. | श्री. किशोर काबरा, रा. जालना यांनी विचारले की, प्रकल्पाच्या आजूबाजूच्या परिसराचा विकास होण्यासाठी काय उपाययोजना आहेत? | श्री. सो.म. कुरमुडे, यांनी सांगितले की, या प्रश्नाचे उत्तर अगोदरच देण्यात आलेले आहे. |
| ८. | प्रो. एच.एम. देसरडा, रा. जालना यांनी आक्षेप लिखीत स्वरूपात नोंदवून सविस्तर त्याबाबत खालीलप्रमाणे तोंडी मुद्दे मांडले- सर्वप्रथम त्यांनी ज्या प्रकल्प सल्लागार यांनी प्रकल्पाचा आघात मुल्यांकन अहवाल तयार केलेला आहे यांच्या बाबत हरकत नोंदवली जसे की, त्यांच्या अहवाल बाबतची विश्वास नियता, त्यांचे शैक्षणिक पात्रता, त्यांना शासनाकडून प्राप्त प्रमाणपत्रे याबाबत आक्षेप नोंदविला पूढे त्यांनी उद्योगास विरोध नाही परंतू पर्यावरण व आरोग्यावर परिणाम होवू नये याची काळजी व्यक्त केली तसेच अहवाल बाबत सविस्तर माहिती देण्यास सांगितले.<br>तसेच सदरच्या सूनावणी समितीमध्ये राज्यस्तरीय अधिकारी असावेत असे मत व्यक्त केले. | यावर डॉ. प्रदीप पिपळतकर, प्रकल्प सल्लागार, यांनी त्यांच्या शैक्षणिक पात्रता बाबत सांगताना ते पर्यावरण विषयामध्ये पी एच डी असून या कार्यक्षेत्रामध्ये ३ त ४ वर्षाचा अनूभव आहे असे सांगितले. तसेच त्यांनी अहवालाचे सादरीकरण याआधीच केले असून पून्हा एकदा प्रकल्प व मूल्यांकण आघात बाबत थोडक्यात माहिती दिली.<br>तसेच पूढे प्रकल्पाचे सल्लागार यांनी सादर केले की, प्रस्तावित उद्योगामध्ये सध्या अस्तित्वात असलेली अत्याधूनिक हवा प्रदूषण नियंत्रण यंत्रणा ज्यामध्ये प्राथमिक व द्वितीय स्वरूपाची हूड, आयडी फॅन, बॅग फिल्टर व चिमणी बसविण्यात येणार आहे. त्यामूळे परिसरामध्ये हवा प्रदूषीत होण्याचा प्रश्नच उदभवत नाही. तसेच ईआय रिपोर्ट हा परिसराचा पर्यावरणीय सखोल अभ्यास करून तयार करण्यात |

| | | |
|---|---|---|
| | १. जालना शहर, परिसर या आधीच स्टील व अन्य प्रदुषणकारी प्रकल्पामुळे सामाजिक व पर्यावरणीय दृष्टया आधीच कमालीचा बाधित, ग्रस्त व त्रस्त असून या प्रकल्पाची जी क्षमता दर्शवली व त्यासाठी जो कच्चामाल व पाणी तसेच वीज वापरण्यात येणार आहे त्यामूळे वायू, जल, ध्वनी व जैवविविधता मोठ्या प्रमाणावर प्रदूषित व प्रभावित होणार आहे.<br>२. दररोज ९०० घनमिटर म्हणजे ९ लाख लिटर पाणी लागणा-या आणि एकलाखाहून अधिक लिटर सांडपाणी सोडणा-या प्राकल्पामुळे पाण्याची प्राचंड गरज लागणा-या या प्रकल्पास पर्यावरणीय मंजुरी देणे गैर आहे. इतर परिसरातील लोक आधीच पाणी टंचाई ने हैराण असताना एका उद्योगाला एमआयडीसी ने एवढे महाभूर पाणी पुरविणे अनादायी आहे.<br>३. सोबतच यास २० मेगा वॅट वीज लागणार आहे, ज्या वीज निर्मितीसाठी प्रचंड कार्बन उसर्जन होते तेथे एवढी अमाप विज लागणारा उद्योग स्थापन करणेस पर्यावरणीय दृष्ट्रया हानीकारक आहे. सामान्य ग्राहक, शेतकरी व छोटे व्यावसायिक यांना सतत वीजेची टंचाई भासत असताना या अत्यंत वीजसाधन उद्योगासाठी वीज पुरवठा करणे अत्यंत चूकीचे आहे.<br>४. मुख्य म्हणजे स्टील उत्पादन अत्यंत मोठ्या प्रमाणात कार्बन उत्पादन करणारा उद्योग आहे. तज्ञांच्या मते, एक टन स्टील पोलाद उत्पादन करताना १.८ टन म्हणजे जवळपास दुप्पट विषारी वायूचे उत्सर्जन होते.<br>५. जालना शहर व परिसरातील आरोग्यास यामुळे मोठा धोका संभवतो. | आलेला आहे तसेच सल्लागार एजन्सी ला शासनाने मान्यता दिलेली आहे.<br>सदरच्या उद्योगास एमआयडीसी तर्फे पाणी पूरवठा करण्यात येणार आहे.<br>यावर श्री. सो. म. कुरमुडे, उप प्रादेशिक अधिकारी, जालना यांनी याबाबत सांतिले की, आपल्या लेखी व तोंडी सूचनांची नोंद घेण्यात आलेली आहे व सदरील आक्षेप इतिवृत्तात समावेश करून शासनास कळविण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| | ६. कोट्यावधी रुपयांच्या या गुंतवणूकीतून रोजगार (२५०लोकांना) जुजवी आहे. सारांश, जमीन, पाणी, वृक्षसंपदा, ध्वनी पातळी व जैवविविधता यांची प्रचंड हानी करणा-या या प्रकल्पास पर्यावरणीय मंजुरी दिली जाऊ नये. | |
| ९. | श्री. अण्णा सावंत, राज्य कॉंसिल सभासद, सीटू, रा. जालना यांनी लिखीत स्वरूपात आक्षेप नोंदवून खालील मुद्दे तोंडी मांडले-<br>१. जालना औद्योगीक परिसरामध्ये सध्या १४ मोठे स्टील उद्योग चालू आहे. त्याचे घातक परिणाम या परिसरावर होत आहे. भट्टीतून निर्माण होणारे विषारी द्रव्य, कण, कार्बन हवेमध्ये मिसळते. त्यामुळे मोठ्या प्रमाणात हवा, पाणि, ध्वनी प्रदुषण होऊन त्याचे परिणाम माणसांवर, जनावरांवर, पिकांवर, जमिनीवर होत असते.<br>२. सध्या चालु असलेल्या १४ स्टील उद्योगाची जेव्हा सुरवात झाली, तेव्हा त्यांनी त्यांच्या प्रोजेक्ट रिपोर्ट मध्ये जी आश्वासने दिली त्यांची तंतोतंत अंमलबजावणी झाली का याचे म.प्र.नि. मंडळाने उत्तर द्यावे. जर त्यांची अंमलबजावणी झाली नसेल तर या नियोजीत उद्यागाचे पण असेच होईल व प्रदुषण पातळीत वाढ होईल.<br>३. दरेगांव या गावातील नागरीकांचे, मुलांचे श्वसनाचे आजार वाढले आहे. परिसरातील शेतक-यांच्या पिकांचे नुकसान होत आहे. तसेच रेशिम उद्योगांवर देखील याचा परिणाम झालेला आहे.<br>४. सद्य:स्थितीत असलेल्या स्टील कारखान्याच्या भट्टीतून निर्माण होणारा धूर १०० टक्के चिमणीतुन बाहेर जात नाही व तो धुर आजू-बाजूला पसरुन परिसरावर त्याचा परिणाम होतो. | डॉ. प्रदीप पिपळतकर, प्रकल्प सल्लागार यांनी याबाबत असे सांगितले की, प्रस्तावित उद्योगामध्ये सध्या अस्तित्वात असलेली अत्याधूनिक हवा प्रदूषण नियंत्रण यंत्रणा ज्यामध्ये प्राथमिक व द्वितीय स्वरूपाची हूड, आयडी फॅन, बॅग फिल्टर व चिमणी बसविण्यात येणार आहे. त्यामूळे परिसरामध्ये हवा प्रदूषीत होण्याचा प्रश्नच उदभवत नाही.<br>सध्या कार्यान्वित असलेले १४ स्टिल उद्योग हे फेज-२, एमआयडीसी मध्ये असून त्याचे अंतर या उद्योगापासून अंदाजे ३ कि.मी. आहे. हा प्रस्तावित उद्योग फेज-३, एमआयडीसी जालनामध्ये येणार आहे. तसेच दरेगाव या गावापासून ४ कि.मी. अंतरावर आहे.<br>या प्रस्तावित उद्योगामध्ये नियमानूसार ३३ % जागा हि वृक्षारोपणासाठी आरक्षित ठेवण्यात आलेली आहे. यावर ४ ते ५ फूट उंचीचे झाडे लावण्यात येतील.<br>भटटीचे तापमान १२०० ते १३०० डिग्री असते व येथे काम करणा-या कामगारांना योग्य वयक्तिक सरंक्षण उपकरणे पूरविण्यात येतील.<br>सदरच्या प्रस्तावित उद्योगामध्ये शासनाने नेमून दिलेल्या क्षमतेनूसारच उत्पादन घेण्यात येईल.<br>आणि सदरच्या उद्योगास एमआयडीसी तर्फे पाणीपूरवठा करण्यात येईल.<br>सदरच्या उद्योगामध्ये स्थानिक कामगारांना प्राधाण्य देण्यात येईल.<br>तसेच याबाबत त्यांनी लेखी स्वरूपात त्यांचे म्हणने सादर केले.<br>यावर श्री. सो. म. कुरमुडे, उप प्रादेशिक अधिकारी, जालना यांनी याबाबत सांतिले की, आपल्या लेखी व तोंडी सूचनांची नोंद घेण्यात आलेली |

| | | |
|---|---|---|
| | ५. सद्य:स्थितीत असलेल्या स्टील कारखान्याकडे जागा अपुरी आहे तसेच भट्टीचे तापमाण १८०० ते १८५० डिग्री सेल्सिअस असते त्यामुळे लावलेली झाडे टिकत नाही.<br>६. कामगारांना कंपनीमध्ये काम करतांना योग्य त्या सोयीसुविधा पुरविल्या जात नाही. त्या मुळे कारखान्यात अपघाताचे प्रमाण फार आहे.<br>७. प्रदूषण वाढण्याचे आणखी एक कारण म्हणजे कारखाना जेवढे उत्पादन दाखवतो त्या पेक्षा दुप्पट क्षमतेने उत्पादन घेत असतो म्हणून प्रदुषणची पातळी वाढते.<br>८. सद्य:स्थितीत असलेल्या स्टील कारखान्या मुळे परिसरातील गावे, शहरे, जमीनी, पाणी हे प्रदुषणा मुळे प्रभावीत झालेले आहेत व त्याचे परिणाम सुधा होत आहेत. हवा प्रदुषणाची पातळी वाढलेली असता सदर प्रकल्पाला मंजुरी देणे अन्याय कारक ठरेल.<br>९. नियोजित प्रकल्पाचा प्रोजेक्ट रिपोर्ट खोटा व असत्य आहे. कारण या प्रकल्पा पासून निर्माण होणारे प्रदुषण नियंत्रण संयत्रणा याची यादी जोडलेली नाही.<br>१०. नियोजित परिसरातील पर्यावरणावर किती घातक परिणाम होईल याचाअचूक वेध घेतलेला नाही. वाढती वाहतुकीचा परिणाम काय होईल. याचाही आभ्यास रिपोर्ट मध्ये नसल्यामुळे रिपोर्ट खोटा व असत्य आहे.<br>११. कारखान्याला एकुण ९०० केएलडी येवढ्या पाण्याची आवश्यकता आहे, जालना शहराला अगोदरच पाणी टंचाई आहे. या कारखाण्याला एमआयडीसी पुर्ण पाणी देवू शकरणार नाही या मुळे कारखाना जमिनीतील पाणी उपसा करणार व पाणी टंचाई आणखी तीव्र | आहे व सदरील आक्षेप इतिवृत्तात समावेश करून शासनास कळविण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| | करणार म्हणून हा कारखाना परवडणारा नाही.<br>१२. या कारखान्यामुळे परिसरातील सामाजीक, आर्थिक विकास तसेच स्थानिक लोकांना रोजगार मिळत नाही.<br>१३. सद्य:स्थितीत सुरु असलेल्या कारखान्यामुळे आजु-बाजुच्या परिसरातील पाणी प्रदुषीत झालेले आहे.<br>१४. जालना जिल्ह्यातील मंजुर झालेला सिडको चा प्रकल्प प्रदुषणाच्या कारणामुळे रद्द झालेला आहे.<br>१५. मा. जिल्हाधिकारी तुकाराम मुंढे साहेब असतांना त्यांनी जनतेच्या तक्रारीची दखल घेऊन कारखान्यांना नोटीसा दिल्या होत्या व प्रदुषण नियंत्रण करण्याची कार्यवाही सुधा केली होती. त्या मुळे प्रदुषणाची पातळी कमी करण्याचे उपाय व नविन प्रकल्पास मान्यता न देणे हे योग्य आहे.<br>१६. कारखान्यांनी दिलेले अश्वासने, अमंलबजावणी व स्थानिक कामगारांचे प्रमाण याची तपासणी करण्यासाठी एक त्रिपक्षीय समीती स्थापण करुन समिती मध्ये शासनाचे, मालकाचे आणि आमच्या संघटनेचे दोन प्रतीनिधी घ्यावेत अशी अपणास आम्ही विनंती करीत आहोत. | |
| १०. | प्रो. एच.एम. देसरडा, रा. जालना यांनी पून्हा एकदा आक्षेप नोंदविला की, हिंदी वृत्तापत्रामध्ये बातमी दिलेली आहे तसेच संबंधित ग्रामपंचायत कार्यालयांना कळविले नाही तसेच अहवालामध्ये सध्या व प्रकल्पामूळे वाढणा-या भविष्यातील प्रदूषणाबाबत स्पष्टता दर्शवली नाही. | यावर श्री. सो. म. कुरमुडे, उप प्रादेशिक अधिकारी, जालना यांनी याबाबत सांतिले की, सदरची जाहीर सूचना ही कूठल्याही हिंदी वृत्तपत्रामध्ये दिलेली नसून नियमाप्रमाणे ३० दिवस अगोदर दैनिक सकाळ व द टाईम्स ऑफ इंडिया वृत्त्पत्रामध्ये दिं. २०/०४/२०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे व परिसरातील सर्व ग्रामपंचायती, जिल्हाधिकारी कार्यालये, जिल्हा उद्योग केंद्र, नगर परिषद, जिल्हा परिषद कार्यालय, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, प्रादेशिक कार्यालय मप्रनि मंडळ, औरंगाबाद, पर्यावरण विभाग, |

| | | |
|---|---|---|
| | | मुंबई, मप्रनि मंडळ मुख्यालय, प्रादेशिक कार्यालया केंद्रीय, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय नागपूर व उप प्रादेशिक कार्यालय जालना तसेच मप्रनि मंडळाच्या संकेतस्थळावर सदरच्या प्रकल्पाची माहिती पूस्तीका नागरिकांच्या अभ्यास व अवलोकनासाठी ठेवण्यात आलेल्या होत्या.<br>यावर पूढे श्री. केशव नेटके, अतिरीक्त जिल्हादंडाधिकारी जालना तथा अध्यक्ष पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी यांनी सांगितले की, उप प्रादेशिक अधिकारी यांनी सांगितल्या प्रमाणे नियमानूसार सदर जाहीरात ३० दिवस अगोदर दैनिक सकाळ व द टाईम्स ऑफ इंडिया वृत्तपत्रामध्ये देण्यात आलेली आहे व संबंधित शासकीय कार्यालयामध्ये माहिती उपलब्द करून देण्यात आलेली होती. तरी आपण नोंदविलेल्या आक्षेपानूसार नियमानूसार पब्लीकेशन झाले नसेल तर यावर तपासून पूढिल कार्यवाही करण्यात येईल.<br>पूढे त्यांनी सांगितले की, सदरची लोकसूनावणी ११.१५ वा. वेळेवर सूरू झाली होती व प्रकल्प व पर्यावरण आघात मूल्यांकन अहवाल बाबत सविस्तर सादरीकरण झालेले होते व आपण उशिरा या सूनावणीस हजर झालात. |
| ११. | श्री.विनोद काळे, पत्रकार, दैनिक बदलता महाराष्ट्र, रा. जालना यांनी सांगितले की, वरील क्रं. ८ व ९ यांनी मांडलेले मुद्येच मला सांगायचे आहेत असे सांगितले व पूढे त्यांनी थोडक्यात सांगितले की, या नवीन कारखान्याला किंवा येणा-या नवीन कारखान्याला माझा विरोध नाही कारण यामूळे परिसराचा विकास होण्यास मतद होते परंतू कारखान्यांमूळे पर्यावरणाला किंवा सार्वनिक जनतेच्या आरोग्याला काही दूष्परीणाम होतोय का याची कारखानदारांनी काळजी घ्यावी. व या कारखान्यांवर संबंधीत प्रशासनाची वेळोवेळी देखरेख असावी. तसेच पूढे त्यांनी सांगितले की, जालना शहरातील पाणी टंचाईवर लक्ष वेधून एवढया मोठया उद्योगास पाणी पूरवठा करणे योग्य आहे का असा प्रश्न उपस्थित केला. | यावर श्री. केशव नेटके, अतिरीक्त जिल्हादंडाधिकारी जालना तथा अध्यक्ष पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी यांनी सांगितले की, सादरीकरणामध्ये प्रकल्प सल्लागार यांनी पाणी पूरवठा विषयी सविस्तर माहिती दिलेली आहे तसेच आपण उपस्थित केलेल्या या प्रश्नाची नोंद घेण्यात आलेली आहे. |

| | | |
|---|---|---|
| १२. | श्री. रंगाराव कोठाकोंडा, सेवअर्थ, तेलंगना, यांनी प्रकल्प व्यवस्थापनाला शुभेच्छा आणि समर्थन दिले. या उद्योगाला बिनशर्त पर्यावरणीय मंजुरीसाठी MoEF&CC कडे शिफारस करत असल्याचे नमूद केले. तसेच उद्योगाचे प्रतिनीधी यांनी पर्यावरणाची काळजी घ्यावी अशी विनंती केली. | यावर श्री. सो. म. कुरमुडे, उप प्रादेशिक अधिकारी, जालना यांनी याबाबत सांतिले की, आपल्या सूचनांची नोंद घेण्यात आलेली आहे. |

श्री. केशव नेटके, अतिरीक्त जिल्हादंडाधिकारी जालना तथा अध्यक्ष पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी यांनी सांगितले की, पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनवाणीच्या अगोदर एकूण ४ निवेदने प्राप्त झालेली आहेत त्याची नोंद घेण्यात आली आहे तसेच लोकसूनावणी दरम्यान नागरिकांनी उपस्थित केलेल्या लिखीत निवेदणे/ सूचना एकूण ८ प्राप्त झाले आहेत तसेच प्रकल्प प्रर्वतकांनी याबाबात त्यांचे स्पष्टीकरण लेखी स्वरूपात सादर केले आहे. या सर्व निवेदनाची व प्रकल्प प्रर्वतकांच्या उत्तरांची प्रदूषण नियंत्रण मंडळांनी येथे नोंद घेतलेली आहे. शेवटी त्यांनी उपस्थित सहभागींचे आभार मानून प्रस्तावित प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहीर लोक सूनावणी समाप्त झाली असे जाहीर केले.

शेवटी अध्यक्षांचे आभार मानून जाहीर लोकसूनावणी संपन्न झाली.

**सो. म. कुरमुडे**
(समन्वयक)
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि. मंडळ, जालना.

**केशव नेटके**
(अध्यक्ष)
तथा
अपर जिल्हादंडाधिकारी जालना